# नवमहाराष्ट्र युवा अभियान

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, नरिमन पॉईंट (मंत्रालयासमोर), मुंबई-४०००२१.

दूरध्वनी : (०२२) २२०२८५९८, २२८५२०८१, फॅक्स : २२८५२०८२


## यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक युवा पुरस्कार : २०२०-२१

### - पुरस्काराच्या अटी व शर्ती -

**पुरस्काराचे स्वरुप :**

१) पुरस्काराचे नाव 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार' असे असेल.

२) महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व भरीव कार्य करणाऱ्या दोन व्यक्तींची (१ युवक व १ युवती) निवड करुन त्यांना प्रत्येकी रु. २१,०००/- (एकवीस हजार रुपये) मात्रचा धनादेश, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येईल.

**पुरस्कार पात्रता :**

१) पुरस्कारासाठी व्यक्तीचे वय ३१ डिसेंबर २०२० पर्यंत ३५ वर्षांच्या आत असले पाहिजे. (सोबत शाळा सोडल्याचा दाखला (साक्षांकीत सत्यप्रत) जोडावा.)

२) सदर व्यक्तीने स्वत: किंवा त्याच्या संस्थेमार्फत सलग पाच वर्षांपेक्षा जास्त काळ महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा चळवळीच्या वा संघटनेच्या माध्यमातून विधायक कार्य केलेले असले पाहिजे.

**निवड मंडळ :**

१) या पुरस्कारासाठी प्रतिष्ठानची कार्यकारी समिती ही निवड मंडळ म्हणून काम करील.

२) निवड मंडळास एखाद्या वर्षी योग्य युवक अगर युवती पुरस्कारास पात्र वाटले नाहीत, तर त्या वर्षीचा पुरस्कार देण्यात येणार नाही.

३) एकदा पुरस्कार प्राप्त झालेल्या व्यक्तीस पुन्हा पाच वर्षांपर्यंत या पुरस्कारासाठी विचारात घेतले जाणार नाही.

४) पुरस्काराबाबत निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील. तसेच ऐनवेळी बदल करण्याचे अधिकार राखून ठेवीत आहे.

**पुरस्कारासाठी प्रस्ताव/शिफारस करण्यासंबंधीचे नियम :**

१) महाराष्ट्रातील विद्यापीठाचे कुलगुरु/विभागीय महसूल आयुक्त/जिल्हाधिकारी/महाविद्यालयाचे प्राचार्य/दैनिक वृत्तपत्राचे संपादक/यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विभागीय केंद्र, आजीव सदस्य, मान्यताप्राप्त सामाजिक संस्था यांच्याकडून प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करण्यात येईल.

२) या पुरस्कारासाठी प्रतिष्ठानच्या विश्वस्तांकडून प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करण्यात येईल.

३) पुरस्कारासाठी मागासलेल्या, दुर्गम, ग्रामीण भागात काम केलेल्या संस्थेच्या कार्यकर्त्यांचे अर्ज प्राधान्याने विचारात घेतले जातील.

४) अर्जासोबत व शिफारशीसोबत पाठविलेले लिखाण, दाखले, फोटो अगर इतर साहित्य परत करणे शक्य होणार नाही. परंतू, त्याबाबतीत निवड मंडळाने मागितल्यास कागदपत्रांच्या मूळ प्रती सादर कराव्या लागतील. अशा मुळ प्रती पुरस्कार वितरणानंतर परत केल्या जातील. (पुरस्कार अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे साक्षांकीत केलेली असावीत.)

५) आपण दिलेल्या माहितीबाबत काही न्यायालयीन अथवा खाजगी वाद उद्‌भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपली असेल. त्याच्याशी प्रतिष्ठानचा कोणताही संबंध नसेल.

६) पुरस्कारासंबंधी प्रस्ताव मागविणेबाबत दरवर्षीच्या नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात महाराष्ट्रातील वृत्तपत्रांतून आवाहन केले जाईल.

७) पुरस्कारासाठीचा प्रस्ताव मंगळवार, दि. ०१ डिसेंबर २०२० पर्यंत मुंबईच्या कार्यालयात प्रत्यक्ष प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

८) आपले निवासस्थान असलेल्या परिसरातील पोलीस स्टेशनचा आपल्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसल्याचा किंवा चौकशी सुरु नसल्याचा दाखला सोबत जोडणे अत्यावश्यक आहे.

## प्रस्ताव/शिफारस करण्याबाबत मार्गदर्शक सूचना

१) अर्ज सुवाच्च अक्षरात असावा. खाडाखोड नसावी.

२) ज्या व्यक्तीची शिफारस केली आहे, त्या व्यक्तीचे संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता, जन्मदिनांक, शैक्षणिक अर्हता, थोडक्यात बायोडाटा व पासपोर्ट साईजचे ३ रंगीत छायाचित्र प्रस्तावासोबत पाठवावेत.

अ) रंगीत छायाचित्र (शिक्का नसलेले) सन २०२० मधील असावे.

ब) १ छायाचित्र अर्जाला चिकटवावे. कोणताही शिक्का छायाचित्रावर असू नये.

क) अर्जासोबत २ छायाचित्रे द्यावीत. छायाचित्रांमागे स्वत:चे संपूर्ण नाव लिहावे.

३) ज्या युवक/युवतीची शिफारस केलेली आहे, त्या व्यक्तीने केलेल्या महत्त्वाच्या कार्याची संपूर्ण माहिती, त्या कार्याची ठळक वैशिष्ट्ये, त्याचे राज्याच्या दृष्टीने मूल्यमापन, त्या कार्यामुळे स्थानिक जनतेला झालेला लाभ, स्थानिक परिसरावरील परिणाम वगैरे तपशीलासह पाठवावी.

४) वरील कार्यासाठी शिफारस केलेल्या व्यक्तीस केंद्र शासन, राज्य शासन, आंतरराष्ट्रीय संघटना, स्वयंसेवी संस्था अशा मार्गांनी मिळालेल्या वा मिळणाऱ्या आर्थिक व इतर सहाय्याची माहिती द्यावी. अधिक विस्ताराने लिहावयाचे असल्यास स्वतंत्र कागदावर रकाने तयार करुन आवश्यक ती माहिती जोडावी.

५) शिफारस केलेल्या व्यक्तीला यापूर्वी पारितोषिके, बक्षिसे अगर मान्यता मिळाली असेल तर त्याचा संपूर्ण तपशील द्यावा.

६) शिफारस करणाऱ्या व्यक्ती/संस्थेचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक द्यावा.

७) अर्धवट भरलेले अथवा अपुऱ्या माहितीचे अर्ज पुरस्कारासाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

८) मुदतीपूर्वी विहित नमुन्यातील अर्ज भरुन सदरील अर्ज,
**संघटक, नवमहाराष्ट्र युवा अभियान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, जनराल जगन्नाथराव भोसले मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई–४०००२१** पत्त्यावर अथवा navmaharashtra@gmail.com या मेल आयडीवर पाठवावेत. पाकिटावर **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक युवा पुरस्कार** असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

- अधिक माहितीसाठी संपर्क – **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई (मनिषा खिल्लारे–022-22028508)**